## श्रीनिधि

- परसातील कोंबडीपालनायोग्य दुहेरी हेतू जात.
- विविध रंगीत पिसारा आणि उत्तम रोग प्रतिकार क्षमता.
- तपकिरी रंगाची आणि मोठी अंडी (५३ ते ५५ ग्रॅम)
- वजन ६ आठवड्यात ५०० ते ६०० ग्रॅम.
- दरवर्षी १४० ते १५० अंडी देण्याची क्षमता.





## ग्रामप्रिया

- प्रामुख्याने अंडी देणारी परसातील कोंबडीपालना योग्य जात.
- ग्रामीण आणि आदिवासी भागात मुक्त शेती उपयुक्त.
- किमान खाद्य वापरुन १६० ते १८० अंडी देण्याची क्षमता.
- १५ आठवड्यात वजन १.२ ते १.५ किलो.
- तंदूर पदार्थ बनवण्यास योग्य मांस.
- मोठी आणि तपकिरी रंगाची अंडी (५७ ते ५९ ग्रॅम)
- कठीण परिस्थितीत जगण्याची क्षमता.








Technical folder no. : 5


संकलन

एस. एस. पवार, बी. सज्जनार,
एम. पी. ब्राह्मणे, ए. वी. निर्मळे,
एन. पी. कुराडे, डॉ. एस. के. बल,
डॉ. नरेंद्र प्रताप सिंह

**अधिक माहितीसाठी संपर्क**

निदेशक

**भाकृअनुप-राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान**

माळेगाव, बारामती 413 115, पुणे, महाराष्ट्र

02112-254057 02112-254056

www.niam.res.in


साकल्य

# परसातील कोंबडीपालन



भाकृअनुप ICAR

हर कदम, हर डगर किसानों का हमसफर
भारतीय कृषि अनुसंधान परिषद
Agrisearch with a human touch

राअस्ट्रैप्रसं NIASM

## भाकृअनुप राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान

## परिचय

- परसातील कोंबडी पालन ही कुक्कुट पालनाची एक जुनी सराव पद्धत आहे जी प्रामुख्याने ग्रामीण भागात वापरली जाते.
- ह्यात प्रामुख्याने घरगुती पद्धतीने तयार केलेला रात्रीचा निवारा, घरगुती खाद्याचा वापर व नैसर्गिक अंडी उबवणी केली जाते. अंडी व मांस हे घरगुती वापरासाठी किंवा स्थानिक बाजारात विकले जाते.
- परसातील कोंबडीपालन हे शेतकऱ्यांच्या फायद्याचे संभाव्य साधन होवू शकते. परसातील कोंबडीपालनासाठी कोणत्याही विशेष पायाभूत सुविधा किंवा कौशल्याची आवश्यकता नाही.
- परसातील कोंबडपालनामुळे अतिरिक्त उत्पन्ना व्यतिरिक्त कुटुंबातील लोकांना मौल्यवान असे प्राणी प्रथिनं मिळतात.
- देशी कोंबड्यांची अंडी आणि मांस उत्पादन क्षमता सहसा कमी असते परंतु सुधारित कोंबड्यांच्या जाती वापरुन अंडी आणि मांस उत्पादन सुधारले जाऊ शकते.




## परसातील कोंबडीपालनाचे फायदे

- शेतकऱ्यांसाठी अतिशय कमी प्रारंभिक गुंतवणूक खर्च व नंतर उत्तम फायदा मिळतो .
- कुक्कुट पालन युनिट फक्त दोन कोंबड्यांवर सुरु करून नंतर क्षमतेनुसार वाढवले जाऊ शकते.
- घरातील उरलेले खाद्य/धान्य ह्याचा कोंबड्यांसाठी खाद्य म्हणून वापर केल्यामुळे विकतच्या खाद्याचा खर्च कमी होतो.
- नैसर्गिक साधनांचा वापर व कमी तणावात पक्षी संगोपन ह्यामुळे परसातील कोंबडीपालन हे सेंद्रीय शेतीच्या दृष्टीने उत्तम समजले जाते. यातून मिळणारे मांस आणि अंडी चांगल्या दर्जाची समजली जातात.
- व्यावसायिक ब्रॉयलर पक्ष्यांच्या तुलनेत देशी पक्षांचे मांस कमी चरबीचे व आरोग्याच्या दृष्टीने उत्तम समजले जाते.
- स्थानिक बाजारात देशी कोंबड्यांची अंडी आणि मांस ह्यांची चांगली मागणी आहे. ह्यामुळे परसातील कोंबड्यांना स्थानिक बाजारात विकले जाऊ शकते व स्थानिक लोक मांस आणि अंडी अधिक दर देवून विकत घ्यायला तयार असतात.
- कुटुंबाचे जे सदस्य शेतीची अवजड कामे करू शकत नाहीत (वयस्कर व्यक्ति किंवा मुले) ते सुद्धा परसातील कोंबडीपालनात मदत करून कुटुंबाचे उत्पादन वाढवण्यास मदत करतात.

## कोंबड्यांच्या योग्य जाती

### वनराजा

- परसातील कोंबडी पालनासाठी विकसित केलेली मांस व अंडी देणारी जात. उत्तम रोग प्रतिकारशक्ती कमी खाद्यात जास्त उत्पादन देणारे पक्षी.
- विविध रंगीत पिसारा आणि तपकिरी अंडी.
- १२ आठवड्यात वजन १.५ ते १.८ किलो. वार्षिक अंडी उत्पादन १०० ते ११० अंडी. देशातील सर्व राज्यांमध्ये शेतकऱ्यांनी स्वीकारलेली कोंबड्यांची जात.





### कडकनाथ

- भारतातील एकमेव काळे मांस असणारी कोंबडी.
- उच्च पोषण मूल्य आणि औषधी गुणधर्म असणाऱ्या काळ्या मांसासाठी प्रसिद्ध. अधिक प्रथिनांची मात्रा, अत्यावश्यक अमिनो ऍसिडस्, खनिजे आणि जीवनसत्त्वे.
- पिसारा आणि सर्व अवयव किंचीत करड्या ते काळ्या रंगाचे. अंडी तपकिरी रंगाची. १४ आठवड्यात वजन साधारण १ किलो.
- मांस आणि अंड्याची बाजारात उच्च किंमत.



